o/c Exh 6/B

# कोर्ट विद्यमान मा. डी. डी. विघ्ने दिवाणी न्यायाधीश क.स्तर कारंजा (घा)
## ता. कारंजा (घा) जि.वर्धा
## जाहिरनामा
## वारसदाराचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार** :— रोशन मुर्खे अधिक २

**विरुद्ध**

**गैरअर्जदार** :— निरंक

एम.जे.सी.क्रमांक: २१/२०२६
पेशी तारीख :०४/०७/२०२६
प्रोसेस क्रमांक......551/26 to 553/26
दिनांक.: १४/०५/२०२६

ज्याअर्थी रोशन देवराव मुर्खे यांनी दिवाणी न्यायालय क. स्तर कारंजा घाडगे या न्यायालयात मयत देवराव सदाशिवराव मूर्खे, यांचा मृत्यु दिनांक २२/०३/२०२१, रोजी झाला. त्याअर्थी त्यांचे वारसदार म्हणून **अर्जदार क्र. १.** रोशन देवराव मूर्खे, वय — ३४ वर्ष, धंदा — शेती, **अर्जदार क्र. २.** रोशन देवराव मूर्खे, वय — ३२ वर्षे, धंदा — शेती, **अर्जदार क्र. ३.** वेणू देवराव मूर्खे, वय — ५९ वर्ष, धंदा — शेती, अर्जदार क्र. १ ते ३ सर्व, बेलगाव, पो. नारा, ता. कारंजा घा., जि. वर्धा विरुद्ध निरंक यांनीं या न्यायालयात सदरहू मयताचे वारसानाचे प्रमाणपत्र मिळावे (Legal Heirship Certificate) असा अर्ज दाखल केला आहे.

मयत देवराव सदाशिवराव मूर्खे यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस म्हणून घोषित करण्यासाठी अर्जदार यांनी वारसान प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळावे याकरिता सदरचा अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार मयताचे वारसान नव्हे असे कोणास सांगावयाचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने दिवाणी न्यायाधीश क. स्तर कारंजा घाडगे जिल्हा वर्धा हया न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय अर्जदार हयांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास अर्जदारांना वारसानाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज १४ मे २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

तयार करणार
(कु. एस. आर. बागडे)
सुट शिरस्तेदार

[Seal: दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)]

आदेशानुसार
(एस. एच गजभिये)
सहाय्यक अधिक्षक
सहायक अधीक्षक दिवाणी न्यायालय, कारंजा घा
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,कारंजा घा.

**प्रतिलीपी** —: १)मा. संपादक, दैनिक विदर्भ मतदार वृत्तपत्र, कार्यालय, वर्धा.
२)कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर कारंजा घाडगे यांचे नोटीसबोर्डवर.
३)तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय कारंजा घाडगे यांचे नोटीसबोर्डवर.
४)नगर पंचायत कार्यालय कारंजा घा., ता. कारंजा (घाडगे) यांचे नोटीसबोर्डवर

**नोट** :— जाहीरात हि ठळक अक्षरात किंवा वाचता येईल अशी प्रसिध्द करणे.

१६७

(2) आज दि 2/6/2026 रोजी मा. दिवाणी न्यायालय क.स्तर कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची एक प्रत लावून प्रसिद्ध केली.

आवक/जावक लिपिक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
कारंजा (घाडगे)

(3) आज दि 2/6/2026 रोजी तहसील कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची एक प्रत लावून प्रसिद्ध केली

2/6/2026
आवक लिपीक
तहसील कार्यालय
कारंजा (घा.)

(4) आज दि 2/6/2026 रोजी नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची एक प्रत लावून प्रसिद्ध केली

R.N. Hajare
2/6/26

## बेलीफ रिपोर्ट

आदेशानुसार मौजा कारंजा (घा) येथे दि 2/6/26 रोजी जाहिरनाम्यात दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर जाऊन जाहिरनाम्याची प्रतिलीपी न 2 ची एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क.स्तर कारंजा (घा) व प्रतिलीपी न 3 ची एक प्रत तहसील कार्यालय कारंजा (घा) तसेच प्रतिलीपी न 4 ची एक प्रत नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डवर जाहिरनाम्याच्या प्रती लावून कार्यालयाच्या संबंधीत अ/जा लीपीकांची स्वाक्षरी व शिक्का घेऊन जाहिरनामे प्रसिद्ध करण्यात आले.

अ. कुं. इंगरकर
दि 2/6/26
(बेलीफ)

## शेरा

सदर जाहिरनाम्याची प्रतिलीपी न 2 ची एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क.स्तर कारंजा (घा) व प्रतिलीपी न 3 ची एक प्रत तहसील कार्यालय कारंजा (घा) तसेच प्रतिलीपी न 4 ची एक प्रत नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर लावून कार्यालयाच्या संबंधीत अ/जा स्वाक्षरी व शिक्का घेऊन जाहिरनामे प्रसिद्ध करण्यात आले.

Bagde 02.06.26
Pro Clerk

## प्रतिज्ञालेख

माझ्या समक्ष श्री अ कुं इंगरकर बेलीफ यांनी प्रतिज्ञालेख वर खरे सांगितले

सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय कारंजा (घा)
02/06/26